पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १७/०९/२०१९*

## पोलीस नक्षल चकमकीत दोन जहाल नक्षलवादी ठार, मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त.

- ४ ते ५ नक्षलवादी जखमी असण्याची शक्यता.
- आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करणार- मा. पोलीस अधीक्षक

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र ग्यारापत्ती हद्दीत नक्षलवादी मोठया प्रमाणात एकत्र आले असुन ते काही घातपात करण्याची शक्यता असल्याची गोपनिय माहिती मा. पोलीस अधीक्षक सो. श्री. शैलेश बलकवडे यांना मिळाली. गोपनिय माहिती वरुन मा. पोलीस अधीक्षक सो. यांच्या मार्गदर्शनाखाली मौजा नारकसा जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलातील सी-६० चे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना सकाळी ०७ ते ७:३० वा. दरम्यान जंगलात दबा धरून बसलेल्या २० ते २५ नक्षलवादयांनी सी-६० जवानांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने जवांनाच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल व स्वंरक्षणासाठी जवानांनी नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी सुमारे अर्धा तासाहुन अधिक वेळ चाललेल्या चकमकीनंतर पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळुन गेले.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात सी-६० जवानांनी शोध अभियान राबविले असता दोन जहाल माओवादी मृत अवस्थेत मिळुन आले. यामध्ये एक पुरुष व एक महिला नक्षलवादयांचा समावेश आहे. पुरुष मृत नक्षलवादीचे नाव लालसु उर्फ शांताराम देवराव गावडे रा. मुरगांव ता. धानोरा जि. गडचिरोली कंपनी क्रं.४ मध्ये तो प्लाटुन पार्टी कमेटी मेंबर म्हणुन कार्यरत होता. तसेच मृत महिला नक्षलवादीचे नाव समिला रा. बस्तर एरिया छ.गड. कंपनी क्रं.४ मध्ये ती सदस्य होती. दोघांवर शासनाने प्रत्येकी ०४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याचबरोबर चकमकीत नक्षलवादयांच्या दैनंदिनी वापराचे साहित्य, एक कार्बाईन, एक बारा बोअर रायफल, राउंड, भुसुरुंग स्फोट घडवुन आणण्याचे साहीत्य, दुर्बिण, वॉकीटॉकी व ट्रान्झिस्टर वा मोठया प्रमाणावर जप्त करण्यात आले. सदर चकमकीत आणखी ४ ते ५ माओवादी जखमी असण्याची शक्यता आहे.

सी-६० कमांडोच्या या शौर्यपुर्ण कामगिरीचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी कौतुक केले आहे. त्याचबरोबर आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.





